Golden Research Thoughts
Vol -2 , ISSUE –10, April.2013
ISSN:- 2231-5063
Available online at www.aygrt.net

ORIGINAL ARTICLE

"इतिहास विषयाचे अध्यापन अप्रत्यक्ष अध्यापन प्रतिमानांच्या सहाय्याने करून त्याची परिणामकारकता तपासणे "

वैजयंता पाटिल
संचालक व सहयोगी प्राध्यापक,
शिक्षणशास्त्र संकुल,
स्वा.रा.ती.म. विद्यापिठ, नांदेड.

रविंद्र वाघमारे
एम.फिल. प्रशिक्षणार्थी,
शिक्षणशास्त्र संकुल ,
स्वा.रा.ती.म. विद्यापिठ नांदेड.

प्रस्तावना :

पाठयपुस्तकातील अभ्यासक्रम शिकविणे म्हणजे विषय अध्यापन नव्हे. पाठयपुस्तकातील अभ्यासक्रमाची उद्दिष्टये प्रत्यक्षात आणणे आवश्यक आहे . ज्ञान कौशल्य , वृत्ती यासारख्या उद्दिष्टांना प्रत्यक्षात आणण्यासाठी आपणास विविध अध्यापन पद्धतीद्वारे अध्यापन करावे लागते आणि हेच अध्यापन कोणत्या पध्दतीने करावे याचा विचार करणे आवश्यक आहे .

जे काही आपण आपल्या विद्यार्थ्यांना देतो ते जास्तीत जास्त चांगल्या व प्रभावी पध्दतीने देण्यासाठी जास्तीत जास्त चांगल्या व प्रभावी पध्दतीने अध्ययन - अध्यापन कृती, विद्यार्थी व शिक्षक यांची कृती व वर्तन निश्चित करणे आवश्यक आहे .

एकाच वर्गामध्ये वेगवेगळया बुध्दिगुणांकाचे विद्यार्थी असतात . त्यांच्यात व्यक्तिभेद आहेत . याचा विचार करून अध्यापन पध्दतीची निवड करणे आवश्यक आहे .

अध्यापन प्रभावी होण्यासाठी आशयानुसार वेगवेगळया अध्यापन पध्दतींचा वापर करावा लागतो . शिक्षण क्षेत्र जसे जसे विकसीत झाले तसतसे ते विद्यार्थी केंद्री बनू लागले . त्यामुळे विद्यार्थी स्वत:विचार करतो व त्यामुळे त्याचा व्यक्तिमत्व विकास होतो .

समस्येचे शीर्षक :

इतिहास विषयाचे अध्यापन अप्रत्यक्ष अध्यापन प्रतिमानांच्या सहाय्याने करून त्याची परिणामकारकता तपासणे

संशोधनाची व्याप्ती :

१.स्थळ व्याप्ती :

प्रस्तुत संशोधनात मंगल सांगवी ता. कंधार जि.नांदेड या गावाचाच विचार करण्यात आलेला आहे .

२.कालावधी व्याप्ती :-

प्रस्तुत संशोधनाचा कालावधी २०१२ हा आहे .

३.नमुना व्याप्ती :

प्रस्तुत संशोधनात श्री साईनाथ विठ्ठलनाथ विद्यालय, मंगलसांगवी येथील इयत्ता ९ वी (अ) मध्ये शिकत असलेल्या ४० विद्यार्थ्यांचा विचार करण्यात आलेला आहे .

संशोधनाची मर्यादा :

१.भौगोलिक मर्यादा :

या संशोधनाचे कार्यक्षेत्र मंगल सांगवी ता. कंधार जि.नांदेड या गावापुरतेच मर्यादित आहे .

२.कालावधी मर्यादा :

सदरील संशोधनाची कालावधी २०१२ पर्यत मर्यादित आहे .

१. हे संशोधन साईनाथ विठ्ठलनाथ विद्यालय, मंगल सांगवी ता. कंधार जि.नांदेड येथील इयत्ता ९ वी (अ) मध्ये शिकत असलेल्या सर्व विद्यार्थ्यांपुरते मर्यादित आहे .
२. हे संशोधन इयत्ता ९ वी (अ) मध्ये शिकत असलेल्या ४० विद्यार्थ्यांपूरतेच मर्यादित आहे .
३. प्रस्तुत संशोधन हे प्रायोगिक पध्दती पुरतेच मर्यादित आहे .

संशोधनाची उद्दिष्टे :

१. इतिहास घटकाच्या अध्यापनासाठी अप्रत्यक्ष अध्यापन प्रतिमानाचा उपयोग करणे .
२. अप्रत्यक्ष अध्यापनाच्या सहाय्याने केलेल्या अध्यापनाचा व पारंपारिक अध्यापन पध्दतीने केलेल्या अध्यापनाचा विद्यार्थ्यांवर झालेल्या परिणामाचा तौलनिक अभ्यास करणे.

परिकल्पना :

१.संशोधन परिकल्पना :

इयत्ता ९ वी इतिहास विषय अध्यापनासाठी पारंपारिक पध्दतीपेक्षा अप्रत्यक्ष अध्यापन प्रमिानाच्या सहाय्याने केलेले अध्यापन अधिक परिणाकारक आहे .

२.शुन्य परिकल्पना :

इयत्ता ९ वी इतिहास विषय अध्यापनासाठी पारंपरिक अध्यापन पध्दत व अप्रत्यक्ष अध्यापन प्रतिमानाच्या सहाय्याने अध्यापन पध्दतीत सार्थ फरक नाही .

संशोधनाची कार्यपध्दती :

१. समान गट :- पूर्व चाचणी घेतल्या नंतर त्यांच्या उत्तर पत्रिका तपासून सर्व विद्यार्थ्यांमध्ये समान दोन गट तयार केले .

२. अप्रत्यक्ष अध्यापन प्रयोग :-

विद्यार्थ्यांमध्ये समान दोन गट तयार केल्यानंतर त्या मधील (अ) गटास प्रायोगीक गट व (ब) गटास नियंत्रित गट असे नावे दिली व (अ) प्रायोगिक गटावर अप्रत्यक्ष अध्यापन प्रतिमान पध्दतीने शिकवले व (ब) नियंत्रित गटावर पांरपरिक पध्दतीने शिकवले अशा पध्दतीच्या प्रयोगाद्वारेइतिहासाच्या घटकाचे अध्यापन पुर्ण केले.

३. उत्तर चाचणी :- प्रयोगाद्वारे अध्यापन पूर्ण झाल्यावर (अ) प्रायोगिक गटाची व (ब) नियंत्रित गटाची उत्तर चाचणी घेतली .

४. प्राप्त माहितीचे विश्लेषण :- उत्तर चाचणी घेतल्यावर (अ) प्रायोगिक गट व (ब) नियंत्रित गटाच्या विद्यार्थ्यांमध्ये अप्रत्यक्ष अध्यापन प्रतिमानाच्या विद्यार्थ्यांला जास्त गुण पडले की पारंपारिक पध्दतीने शिकवलेल्या विद्यार्थ्यांना जास्त गुण पडले हे त्यांना पडलेल्या गुणांवरून माहितीचे विश्लेषण केले .

निष्कर्ष :

१. पारंपारिक पध्दतीने व अप्रत्यक्ष अध्यापन प्रतिमानाने अध्यापन केल्यानंतर अप्रत्यक्ष अध्यापन प्रतिमान श्रेष्ठ ठरले .

२. अप्रत्यक्ष अध्यापन प्रतिमानाने इतिहास घटकाचे अध्यापन केले असता रस ग्रहण अभिरूची ही उद्दिष्टे साध्य होण्यास मदत होते .

३. प्रायोगिक गटास अप्रत्यक्ष अध्यापन प्रतिमानाने अध्यापन करून त्याची उत्तर चाचणी घेतली तेव्हां पूर्व चाचणी पेक्षा उत्तर चाचणीतील गुणात आमुलाग्र बदल झालेला दिसून आला .

४. प्रायोगिक गटास अप्रत्यक्ष अध्यापन प्रतिमानाने अध्यापन केल्यानंतर घेतलेल्या उत्तर चाचणीत प्राप्त केलेल्या गुणांवरून आढळले की , प्रायोगिक गटातील विद्यार्थ्यांच्या गुणाची टक्केवारी प्रयोगपूर्व गटापेक्षा अधिक होती .

५. प्रायोगिक व प्रयोगपूर्व गटातील विद्यार्थ्यांच्या प्राप्तांकात लक्षणीय फरक दिसुन आला .

६. अप्रत्यक्ष अध्यापन प्रतिमानाचा वापर अधिक परिणामकारक व प्रभावी ठरतो .

७. अप्रत्यक्ष अध्यापन प्रतिमानाने अवघड विषय सोपा करून सांगता येतो .

शिफारशी :

शिक्षकांसाठी शिफारशी :

१. शिक्षकाने अध्यापनाच्या विविध नवीन तंत्राची माहिती करून घ्यावी .

२. शिक्षकानी अध्यापनाच्या प्रतिमानाविषयी माहिती करून घ्यावी

३. विविध प्रतिमानानुसार पाठयघटक निवडून त्या पाठ्यघटकाचे पाठ टाचण तयार करून त्यानुसार पाठ्यघटक शिकवावा .

मुख्याध्यापकासाठी शिफारशी :

१.अध्यापनाच्या प्रतिमानावर आधारित संदर्भ ग्रंथाची खरेदी करावी .

२.अध्यापन प्रतिमानाचा वापर करण्याविषयी शिक्षकांना प्रेरित करावे .

३.शक्षकांना अध्यापनात प्रतिमानाचा वापर करण्याविषयी मार्गदर्शन करावे .

४.माध्यामिक शालेय अभ्यासक्रम निर्मिती व संशोधन मंडळाने इतिहास विषयाच्या हस्तपुस्तिकामध्ये अप्रत्यक्ष अध्यापन पध्दतीच्या माहितीचा समावेश करावा .

शासनासाठी शिफारशी :

१.शिक्षक हस्तपुस्तिकेत कोणता घटक कोण-कोणत्या तंत्राच्या सहाय्याने वा कोणकोणत्या पध्दतीच्या सहाय्याने अध्यापन करता येईल हे सुचवावे .

२.शिक्षक हस्तपुस्तिकेत प्रतिमानावरील नमुना पाठ टाचणांचा समावेश करावा .

३.अभासक्रमातील घटक संकल्पनांना स्वरूप द्यावे .

४.प्रतिमानाविषयी शिक्षकांमध्ये जागृती निर्माण करण्यासाठी शिबीरे , ऊजळणी वर्ग , प्रशिक्षण वर्ग , ऊजळणी सत्रे इत्यादीचे आयोजन करावे .

५.जिल्हा स्तरावर विस्तार केंद्राच्या माध्यामातून अप्रत्यक्ष अध्यापन पध्दतीसाठी अध्यापकांसाठी विशेष प्रशिक्षण देण्यात यावे .

संदर्भ ग्रंथसुची :-

१. **मुळे रा.शं. आणि उमाठे वि.तु.**,(१९९८) शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे (आवृत्ती तिसरी), विद्या प्रकाशन, औरंगाबाद.
२. **भितांडे वि.रा.**,(२००४), शैक्षणिक संशोधन पध्दती , नुतन प्रकाशन पूणे.
३. **बापट भा.गो.**,(१९५६), शैक्षणिक संशोधन, (तिसरी आवृत्ती), नुतन प्रकाशन, पुणे.
४. **उपासनी ना.के.**, कुलकर्णी के.वि.(१९८७) नवे शैक्षणिक मुल्यमापन आणि संख्याशास्त्र, श्री विद्या प्रकाशन पुणे.
५. **देशपांडे लीना**, (१९९९), सर्वेक्षण एक संशोधन पध्दती, पुष्प चौथे, य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक.